महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण २०१७/सं.क्र.३२० /व्यय-१४
वित्त विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- १० एप्रिल, २०१८.

संदर्भ: १) शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही २००४/प्र.क्र.१५/१२,दिनांक २५.५.२००६
२) शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग क्र.पीओडी १००७//प्र.क्र.९/१८(र.व का.),दि.१४.११.२०१३
३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण२०१२/प्र.क्र.५४/१८ (र.व का.),दि.११.८.२०१४

कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ हा राज्यात लागू करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे या अधिनियमातील प्रकरण ३ करीता शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध नियम २०१३ तयार करण्यात आले असून ते दिनांक १४ नोव्हेंबर,२०१३ च्या अधिसूचनेव्दारे राज्यात लागू करण्यात आले आहेत.

त्यानुषंगाने सदर कार्यासनाशी संबंधित विषयाच्या बाबतीत सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेण्यासाठी सादरीकरणाचे स्तर निश्चित करण्यात येत आहेत. तथापि,वरिष्ठ अधिका-यांचे निदेश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास प्रकरणपरत्वे योग्य तो बदल करण्यात येईल. तसेच धोरणात्मक बाबींच्या प्रकरणात दि.११.८.२०१४ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार सादरीकरणाचे तीनपेक्षा अधिक स्तर असतील.

सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१०११५४३५०८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Surendra L Ambilpure

Digitally signed by Surendra L Ambilpure
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d72bc3a62ca80a6ce5d7700b4fdbe6d0ab222bee157f5f99572baa77b2945a2, cn=Surendra L Ambilpure
Date: 2018.04.10 11:58:47 +05'30'

(सुरेंद्र.लो. अंबिलपूरे)
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
२) अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) यांचे स्वीय सहायक,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
३) प्रधान सचिव (व्यय)/प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), यांचे स्वीय सहायक,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) उप सचिव (प्रशा-१/प्रशा-२) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
५) उप सचिव,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.
६) अवर सचिव (प्रशा-२) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
७) निवडनस्ती

कार्यालयीन आदेश क्र.संकीर्ण-२०१७/ सं.क्र.३२०/व्यय-१४, दिनांक. १० एप्रिल,२०१८सोबतचे विवरणपत्र

शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ९(२) अंतर्गत कार्यासनाशी संबंधित बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरणे सादर करण्याबाबत अधिकारांचे तीन स्तर निर्धारित करणे.

अ. क्र.	कार्यासनाकडून हाताळले जाणारे कामकाज	सादरीकरणाचे ३ स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकारी
१	२	३	४	५	६
१.	व्यय विषयक अनौपचारिक संदर्भ	स.क.अ./कक्ष अधिकारी / अवर सचिव	उप सचिव/सहसचिव	सबंधीत सचिव अ.मु.स. /प्र.स. (वि.सु.)	सबंधीत सचिव/प्र.स./ अ.मु.स. (वि.सु.)
२.	पुरक मागणी / निधी वितरणाबाबतचे प्रस्ताव	स.क.अ./कक्ष अधिकारी/ अवर सचिव	उप सचिव/सह सचिव, उप सचिव/सह सचिव (अर्थसंकल्प)	सबंधीत सचिव/ प्र.स. (वि.सु.)	सबंधीत सचिव/प्र.स./अपर मुख्य सचिव
३.	मंत्रीमंडळ टिप्पण्या	स.क.अ./कक्ष अधिकारी/ अवर सचिव	उप सचिव/सहसचिव	सबंधीत अ.मु.स./ प्र.स. (वि.सु.)	सबंधीत सचिव/प्र.स./अपर मुख्य सचिव
४.	लोकप्रतिनिधींकडून प्राप्त संदर्भ	कक्ष अधिकारी/स.क.अ.	अवर सचिव	सबंधीत उप सचिव /सह सचिव	सबंधीत उप सचिव /सचिव/प्र.स./ अ.मु.स.
५.	माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त अर्ज हाताळणे.	स.क.अ./कक्ष अधिकारी/अ.स.	अवर सचिव	सबंधीत उप सचिव /सह सचिव	सबंधीत उप सचिव /सहसचिव
६.	सर्वसाधारण संदर्भ	स.क.अ./कक्ष अधिकारी	अवर सचिव	सबंधीत उप सचिव /सह सचिव	सबंधीत उप सचिव /सह सचिव